06 JAN 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माणसांच्या स्मृतींचे विस्थापन भयावह

## कृष्णात खोत : विद्यापीठात 'लेखक आपल्या भेटीला' कार्यक्रमास प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

माणसांचे विस्थापन हा आजच्या जगण्यातला महत्त्वाचा प्रश्न आहेच, पण माणसाच्या स्मृतींचे जाणीवपूर्वक करण्यात येत असलेले विस्थापन भयावह आहे, हे रोखणे आजघडीला फार महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त साहित्यिक कृष्णात खोत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातर्फे 'लेखक आपल्या भेटीला' या कार्यक्रमात कृष्णात खोत यांच्यासह 'रिंगाण' या पुरस्कारप्राप्त साहित्यकृतीच्या इंग्रजी अनुवादक डॉ. माया पंडित यांच्यासमवेत संवाद आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.



'लेखक आपल्या भेटीला' या कार्यक्रमात बोलताना लेखक कृष्णात खोत. मंचावर डॉ. माया पंडित, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. तृप्ती करेकट्टी.

खोत म्हणाले, माणूस स्वेच्छा आणि सक्ती या दोन प्रकारांनी विस्थापन स्वीकारतो. स्वेच्छा विस्थापनामध्ये तो त्याला अभिप्रेत प्रगतीच्या अनुषंगाने बदल स्वीकारतो आणि पुढे जातो. त्यामध्ये वेदना आहेत, पण त्यांसह आपण ते विस्थापन मान्य करतो. सक्तीच्या विस्थापनामध्ये आपली मान्यता नसतानाही भाषा, चव, वेशभूषा असा सारा परिवेशच बदलून जातो आणि त्यामुळे असह्य वेदना वाट्याला येते. या प्रश्नाकडे संवेदनशिलतेने पाहण्याची गरज आहे.

यावेळी डॉ. माया पंडित यांनीही मत मांडले. अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कृष्णात खोत हे संवेदनशील लेखक आहेत. माणसांचे, त्यांच्या जगण्याचे वर्षानुवर्षांचे निरीक्षण आणि अनुभव यांच्या संचितातून त्यांच्या साहित्यकृती जन्मल्या आहेत. विस्थापितांसोबत राहून, त्यांच्या वेदना जाणून घेऊन केलेले हे लेखन आहे.

साहित्य अकादमी पुरस्कार घोषित झाल्याबद्दल कृष्णात खोत व अनुवादक डॉ. पंडित यांचा सत्कार कुलगुरूंच्या हस्ते झाला. प्रास्ताविक डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी केले. मेघा कांबळे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी आभार मानले.

कार्यक्रमास डॉ. राजाराम गुरव, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. रणधीर कांबळे, डॉ. रघुनाथ कडाकणे, डॉ. प्रभंजन माने, विलास सोयम, प्रा. शांताराम कांबळे, डॉ. सुनिल पाटील, डॉ. गोमटेश पाटील आदी उपस्थित होते.

# माणसांच्या स्मृतींचे जाणीवपूर्वक विस्थापन भयावह

## कृष्णात खोत यांची खंत : शिवाजी विद्यापीठात 'लेखक आपल्या भेटीला'

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : माणसांचे विस्थापन हा आजच्या जगण्यातला महत्त्वाचा प्रश्न आहेच; पण माणसाच्या स्मृतींचे जाणीवपूर्वक करण्यात येत असलेले विस्थापन भयावह आहे. हे रोखणे आजघडीला फार महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त साहित्यिक कृष्णात खोत यांनी शुक्रवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागाच्या वतीने 'लेखक आपल्या भेटीला' या कार्यक्रमात खोत यांच्यासह 'रिंगाण' या पुरस्कारप्राप्त साहित्यकृतीच्या इंग्रजी अनुवादक डॉ. माया पंडित यांच्यासमवेत संवाद



आयोजित करण्यात आला. वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या नीलांबरी सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

खोत म्हणाले, भौतिक, भौगोलिक विस्थापन गरज किंवा सक्ती म्हणून मान्यही करता येईल; पण सध्या माणसांच्या स्मृतींचे विस्थापन करण्यात येत आहे, ते रोखण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे. स्मृतीचे विस्थापन हे एका साखळीला धक्का देणारे ठरत असते. आपल्यासमवेत सहजीवन जगणाऱ्या जिवांना गृहीत धरणेसुद्धा अत्यंत चुकीचे आहे. सत्तेला प्रश्न विचारण्याची जबाबदारी लेखकाची आहे, त्याचप्रमाणे शांततेचा आवाज दीर्घ करीत नेण्याची जबाबदारीही त्याने स्वीकारायला हवी.

डॉ. माया पंडित म्हणाल्या, मूळ साहित्यकृतीशी तादात्म्यतेखेरीज अनुवाद साधणे अशक्य असते. कृष्णात खोत यांनी विस्थापितांच्या परवडीचे केलेले चित्रण विदारक आणि अस्वस्थ करणारे आहे. त्यांचे जगणे आपल्यातून प्रवाहित होऊ द्यायला हवे.

इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. मेघा कांबळे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी आभार मानले.

कार्यक्रमास वनस्पतीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. राजाराम गुरव, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. रणधीर कांबळे, डॉ. रघुनाथ कडाकणे, डॉ. प्रभंजन माने, विलास सोयम, प्रा. शांताराम कांबळे, डॉ. सुनील पाटील, डॉ. गोमटेश पाटील आदी उपस्थित होते.

0 6 JAN 2024 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लेखकांनी सत्तेला प्रश्न विचारावेत

## कृष्णात खोत; विद्यापीठातील 'लेखक आपल्या भेटीला' कार्यक्रमात संवाद

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : 'सत्तेला प्रश्न विचारण्याची जबाबदारी लेखकाची आहे, त्याचप्रमाणे शांततेचा आवाज दीर्घ करीत नेण्याची जबाबदारीही त्याने स्वीकारायला हवी', असे मत साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त साहित्यिक कृष्णात खोत यांनी आज येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातर्फे आयोजित 'लेखक आपल्या भेटीला' या कार्यक्रमात साहित्यिक खोत आणि 'रिंगाण' च्या इंग्रजी अनुवादक डॉ. माया पंडित यांनी संवाद साधला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.



कोल्हापूर : 'लेखक आपल्या भेटीला' या कार्यक्रमात बोलताना कृष्णात खोत. यावेळी डावीकडून डॉ. माया पंडित, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. तृप्ती करेकट्टी.

विस्थापितांच्या परवडीचे खोत यांनी केलेले चित्रण विदारक आणि अस्वस्थ करणारे आहे. त्यांच्या दुःखाशी तादात्म्यता अत्यावश्यक आहे अन्यथा विनाश अटळ असल्याचे डॉ. पंडित यांनी सांगितले.

### 'रिंगाण' जागतिक स्तरावर जाण्याची गरज

ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर म्हणाले, खोत त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीमधून निसर्गाच्या बदलांचे प्रत्ययकारी सूचन करतात. विस्थापितांच्या वेदनेचे दर्शन ते घडवितात. 'रिंगाण'चा आवाका इतका मोठा आहे की जागतिक स्तरावर ती जाणे गरजेचे आहे.'

06 JAN 2024 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निसर्गाच्या नष्टतेमुळे आत्मनाश शक्य

## पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी

कोल्हापूर

निसर्गाची हत्या ही आत्महत्या आहे. निसर्गातील बदलांचा प्राण्यांच्या वर्तनावर परिणाम होत आहे. हे वेळीच समजून घेण्याची गरज आहे. निसर्गाला जितके नष्ट केले जाईल, तितकीच आत्मनाशाकडे वाटचाल होईल, असे प्रतिपादन ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागाच्या वतीने कृष्णात खोत यांच्या साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त 'रिंगाण' या

■ शिवाजी विद्यापीठात परिसंवादामध्ये निसर्ग संवर्धनावर चर्चा





कोल्हापूर : परिसंवादात ऑनलाईन मार्गदर्शन करताना ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर.

कादंबरीवर परिसंवादात ते बोलत होते. परिसंवादामध्ये ज्येष्ठ समीक्षक डॉ. रणधीर शिंदे आणि लेखक–अनुवादक डॉ. रघुनाथ कडाकणे यांनी सहभाग घेतला. माणूस आणि निसर्ग यांच्यातील सहसंबंधांचे मराठी साहित्यात अभावानेच आढळणारे चित्रण कृष्णात खोत यांनी 'रिंगाण' या कादंबरीमध्ये केले आहे. हे सहसंबंध जोपासण्याचा संदेश आपण आत्मसात केला नाही तर विनाश अटळ आहे, असा सूर परिसंवादामध्ये उमटला.

'रिंगाण'च्या अनुवादक डॉ. माया पंडित यांनीही संवाद साधला. इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी आणि डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 JAN 2024

पुण्यनगरी



कोल्हापूर : साहित्यिक कृष्णात खोत यांचे अभिनंदन करताना कुलगुरू प्रा. डॉ. दिगंबर शिर्के, सोबत प्रा. डॉ. नंदकुमार मोरे व सुनीता कृष्णात खोत.

# खोत यांच्या यशाचा अभिमान : कुलगुरू शिर्के

**सुळे :** साहित्यिक कृष्णात खोत यांच्या ''रिंगाण'' या कादंबरीला साहित्य अकादमी, दिल्ली यांचा सर्वोच्च पुरस्कार जाहीर झाला. त्यानिमित्त त्यांचे अभिनंदन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. दिगंबर शिर्के यांनी त्यांची बाळासाहेब इंगवले पार्क, फुलेवाडी येथील निवासस्थानी भेट घेतली. खोत शिवाजी यांनी मिळवलेल्या यशाबद्दल विद्यापीठाला सार्थ अभिमान असल्याचे समाधान व्यक्त करणारे अभिनंदन पत्र व छत्रपती शाहू महाराज यांचा चरित्र ग्रंथ भेट देऊन त्यांनी खोत यांना पुढील साहित्यिक कार्याला शुभेच्छा दिल्या. यावेळी मराठी अधीविभागाचे प्रमुख प्राध्यापक डॉ. नंदकुमार मोरे, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, सुनीता कृष्णात खोत आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

0 6 JAN 2024 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महर्षी शिंदेंकडून ज्ञानपरंपरेची फेरमांडणी

## हेमंत राजोपाध्ये; शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे प्राच्यविद्येचे पहिले भारतीय विवेकी अभ्यासक होते. त्यांनी प्राच्यविद्येच्या अंगाने भारतीय समाजाचे विश्लेषण केले. भारतीय ज्ञानपरंपरा आणि प्राच्यविद्या यांची फेरमांडणी केली. त्यातील प्रामाण्य खोडून काढण्याचे काम केले', असे प्रतिपादन हेमंत राजोपाध्ये यांनी केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात बोलताना हेमंत राजोपाध्ये. यावेळी डावीकडून डॉ. नंदकुमार मोरे, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि डॉ. रणधीर शिंदे.

शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महर्षी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित 'प्राच्यविद्या आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. राजोपाध्ये म्हणाले, 'महाराष्ट्रात आरंभकाळात प्राच्यविद्येचा अभ्यास करणारे महर्षी शिंदे पहिले भारतीय संशोधक होते. भारतीय परंपरा व संस्कृतीचे त्यांना डोळस भान होते. त्यांच्या या अभ्यासात इतिहास, तौलनिक धर्मदृष्टी, समाजशास्त्र, भाषाभ्यासाची दृष्टी होती.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'महर्षी शिंदे यांचे न वाचले गेलेले पैलू विद्यार्थ्यांनी वाचायला हवेत, ज्यामुळे महर्षींची नव्याने ओळख होईल.' अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. अशोक चौसाळकर, राजन गवस, प्रकाश पवार, भारती पाटील, अवनीश पाटील, प्रभंजन माने, अक्षय सरवदे, अरूण शिंदे उपस्थित होते. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ.नंदकुमार मोरे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी आभार मानले.

0 6 JAN 2024
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महावीर अध्यासनास लाखाची देणगी

## अरविंद पाटील यांनी दिले १ लाख ११ हजार रुपये

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जयसिंगपूर येथील अरविंद गिरगोंडा पाटील यांनी शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारतीसाठी त्यांच्या पत्नी सुलोचना पाटील यांच्या स्मृत्यर्थ १ लाख ११ हजार रुपयांची देणगी दिली. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी त्यांचा सत्कार केला.

यावेळी अविनाश कुंभोजकर, प्रतिभा कुंभोजकर, ज्योती पाटील, विपुल पाटील उपस्थित होते. इमारत बांधकामास सर्व दानशूर, व्यक्ती व संस्थांनी मदत करावी, असे आवाहन प्रा. डॉ. विजय ककडे यांनी केले.



जयसिंगपूर येथील अरविंद गिरगोंडा पाटील यांनी शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारतीसाठी त्यांच्या पत्नी सुलोचना पाटील यांच्या स्मृत्यर्थ १ लाख ११ हजार रुपयांची देणगी दिली. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी त्यांचा सत्कार केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 JAN 2024
पुण्यनगरी

# महावीर अध्यासन इमारतीसाठी देणगी

कोल्हापूर : जयसिंगपूर येथील अरविंद पाटील यांनी शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारतीसाठी १ लाख ११ हजार रूपयांची देणगी त्यांच्या पत्नी सुलोचना पाटील यांच्या स्मृत्यर्थ दिली. या प्रसंगी त्यांचा सत्कार विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केला. याप्रसंगी अविनाश कुंभोजकर, प्रतिभा कुंभोजकर, ज्योती पाटील, विपुल पाटील उपस्थित होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, व वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांनी अरविंद पाटील यांचे आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 JAN 2024
लोकमत

# पत्रकार दिनानिमित्त विद्यापीठात आज कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : मराठी पत्रकारिता दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागात 'पॅलेस्टाईन आणि इस्त्राईल संघर्ष माध्यमांची भूमिका' या विषयावर आज शनिवारी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी ११ वाजता कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. प्रमोद पाटील अध्यक्षस्थानी असतील.

कार्यशाळेत ज्येष्ठ संपादक दशरथ पारेकर, आणि इतिहास विभागाचे माजी प्रमुख प्रा. डॉ. एम. पी. पाटील मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेत विद्यार्थी, पत्रकार आदींनी सहभागी व्हावे, असे आवाहन विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 JAN 2024
सकाळ

# पत्रकार दिनानिमित्त विद्यापीठात आज कार्यशाळा

कोल्हापूर : पत्रकार दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागातर्फे उद्या, शनिवारी सकाळी ११ वाजता 'पॅलेस्टाईन आणि इस्त्राईल संघर्ष : माध्यमांची भूमिका' या विषयावर कार्यशाळा होणार आहे. मानव्यशास्त्र सभागृहातील या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील अध्यक्षस्थानी असतील. या कार्यशाळेत ज्येष्ठ पत्रकार, राजकीय विश्लेषक श्रीराम पवार, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर आणि इतिहास विभागाचे माजी प्रमुख प्रा. डॉ. एम. पी. पाटील मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेत विद्यार्थी, पत्रकार, आदींनी सहभागी व्हावे, असे आवाहन विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 JAN 2024
पुण्यनगरी

# पत्रकार दिनानिमित्त विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर : मराठी पत्रकारिता दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागात 'पॅलेस्टाईन आणि इस्त्राईल संघर्ष : माध्यमांची भूमिका' या विषयावर एकदिवशीय कार्यशाळचे आयोजन केले आहे. मानव्यशास्त्र सभागृहात दि. ६ रोजी सकाळी ११ वाजता कार्यशाळेचे उद्घाटन होईल. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील अध्यक्षस्थानी असतील. कार्यशाळेत ज्येष्ठ संपादक दशरथ पारेकर, श्रीराम पवार आणि इतिहास विभागाचे माजी प्रमुख डॉ. एम. पी. पाटील मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा जिल्हा माहिती कार्यालय, कोल्हापूर प्रेस क्लब, फोटोग्राफर व्हिडिओग्राफर अॅन्ड एटिडर्स असोशिएशन, ऐतवडे येथील वारणा महाविद्यालय, कराड येथील शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, तिटवे येथील शहीर वीरपत्नी लक्ष्मीबाई महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली आहे. या कार्यशाळेत विद्यार्थी, पत्रकार आदींनी सहभागी व्हावे, असे आवाहन विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 JAN 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात आज कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात पत्रकार दिनानिमित्त शनिवारी ६ रोजी सकाळी ११ वाजता मानव्यशास्त्र सभागृहात कार्यशाळेचे आयोजन केले आहे. 'पॅलेस्टाईन आणि इस्त्राईल संघर्ष : माध्यमांची भूमिका' यावर ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, श्रीराम पवार व डॉ. एम. पी. पाटील मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 JAN 2024
पुढारी

# विद्यापीठाकडून ४९६ परीक्षांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर ४९६ अभ्यासक्रमांचे निकाल आज घोषित झाले. विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, बॅचलर ऑफ फार्मसी, मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी, बॅचलर ऑफ ॲग्रीकल्चर आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालये व अधिविभागामध्ये झाल्या. परीक्षेला दोन हजार ६५५ विद्यार्थी बसले होते. शुक्रवारी (दि. ५) एम.टेक., बी.आर्किटेक्चर, मास्टर ऑफ जर्नालिझम आदी अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 JAN 2024
सकाळ

# 'एलएलबी' परीक्षेच्या निर्णयाचे बार असोसिएशनकडून स्वागत

## पदाधिकाऱ्यांची कुलगुरूंसमवेत चर्चा

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ५ : अपुऱ्या हजेरीमुळे अपात्र ठरलेल्या सुमारे ७०० विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याबाबत शिवाजी विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयाचे आज कोल्हापूर जिल्हा बार असोसिएशनने स्वागत केले. असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्याशी चर्चा केली.

अपात्र ठरलेल्यांपैकी काही विद्यार्थ्यांनी आणि महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेने विनाअट परीक्षा देण्यास परवानगी देण्याची विद्यापीठाकडे मागणी केली. त्यावर गुरुवारी विद्यापीठाची तातडीने व्यवस्थापन परिषदेची बैठक झाली. त्यात हजेरीबाबतच्या ७० टक्क्यांचा निकष पूर्ण केल्यानंतरच एलएलबीच्या तीन आणि पाच वर्षांच्या विद्यार्थ्यांना परीक्षा देता येईल, असा निर्णय घेण्यात आला. त्याबाबत आज कोल्हापूर जिल्हा बार असोसिएशनचे सचिव तेजगोंडा पाटील, कार्यकारिणी सदस्य ओंकार पाटील, आदींनी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासमवेत चर्चा केली. त्यात कायद्याचे पालन आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाणार नाही याअनुषंगाने विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी नियमांचे पालन केले पाहिजे. विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून कायदेशीर शिक्षण दिले जात आहे. त्याठिकाणी विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी येतात. त्यामुळे हजेरी, परीक्षा आदींबाबतची परिपत्रके विद्यापीठाने आम्हाला देखील पाठवावीत. त्याबाबतची माहिती असोसिएशनकडूनही या विद्यार्थ्यांना दिली जाईल, असे सचिव पाटील यांनी सांगितले. यावेळी अधिसभा सदस्य अभिषेक मिठारी, ॲड. प्रसाद कुंभार, योगेश सावंत, सचिन रेडेकर, सरदार किरवेकर आदी उपस्थित होते.